सक्षम प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), कुडाळ

यांचे कार्यालय

कार्यालय – कुडाळ, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग

---

राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ कसाल ते झाराप

(कि.मी.४१९/८०० ते ४५०/१७०)

# :: भूसंपादन पुरवणी निवाडा क्र.२ ::

राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ (१९५६ चा कायदा ४८) कलम ३G (१)

अन्वये नुकसान भरपाई आदेश

## भूसंपादन प्रकरण क्रमांक ७/२०१४

| | |
|---|---|
| मुल्यांकन दिनांक | :- सन २०२२ |
| आदेश दिनांक | :- २२/०५/२०२३ |
| गावाचे नांव | :- पावशी |
| तालुका | :- कुडाळ |
| जिल्हा | :- सिंधुदुर्ग |

वाचले :-

१. प्रकल्प संचालक भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (सडक परिवहन व राज्यमार्ग मत्रालय भारत सरकार) यांजकडील पत्रान्वये राष्ट्रीय महामार्ग क्र.१७ राजापूर ते झाराप (NH-६६) कि.मी. ३५१.०० ते ४५०.१७० विस्तारीत करण्यासाठी व नामनिर्देशन करणेसाठीचे पत्रान्वये मा.जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांचे पत्र.क्र.१६०२६/१४०/२०१३-COLL-REV दि.१९/०९/२०१३ नुसार भूसंपादन प्रक्रिया पार पाडण्याकरिता उपविभागीय अधिकारी (महसूल), कुडाळ यांचे नामनिर्देशन अधिसूचीत करणेसाठी कळविणेत आले होते.

२. राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ कलम ३(a) अन्वये राज्यमार्ग व सडक परिवहन विभाग भारत सरकार नवी दिल्ली यांचेकडील क्र.का.आ.३९(अ)अधिसूचना प्रसिद्ध दिनांक ७ जानेवारी २०१४ अन्वये राष्ट्रीय महामार्ग १७ (नविन-६६) करिता उपविभागीय अधिकारी (महसूल), कुडाळ यांची सक्षम प्राधिकारी म्हणून नेमणूक केली आहे.

३. क्र.एल.क्यू.एन/१२/२०१३ प्र.क्र.१९०/अ२ ज्या अर्थी भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ (२०१३ चा ३०) महसूल व वनविभाग मुंबई अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग ४ अ मधील असाधारण क्रमांक ७०, दि. २५ मे, २०१५.

४. भारतीय राजमार्ग प्राधिकरण नवी दिल्ली यांचे पत्र क्र.NHAI/११०/०३/dmg (L.A.&Coord)२०१५/FTS-४१७/७०६८९, दि.२४/०८/२०१५

५. उपसचिव महाराष्ट्र शासन यांजकडील पत्र क्र.संकीर्ण-१०/२०१५/प्र.क्र.१३३/अ-२ महसूल व वनविभाग, दि.०५/१०/२०१५.

६. विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांजकडील पत्र क्र.जा.क्र.नर/निवाडा शाखा/ पो.ख/धारणा कायम/२०१६/१४२, दि.१९/१०/२०१६.

७. भारत सरकार, Ministry of Road Transport & Highway यांजकडील पत्र क्रमांक No.NH-११०११/३०/२०१५LA दि.२८/१२/२०१७ (GUIDELINES)

८. महाराष्ट्र शासन निर्णय क्र.संकीर्ण-०१/२०१८, प्र.क्र.११/अ-२, दि.०४/०४/२०१८

९. कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, रत्नागिरी यांचेकडील पत्र जा.क्र.रामवि/ रत्ना/पीबी/पीओ-१/६३७, दि.१५/०२/२०२० अन्वये मौजे—पावशी, ता.कुडाळ जि.सिंधुदुर्ग जमीन संपादनाबाबतचा प्रस्ताव

१०. कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, सावंतवाडी यांजकडील पत्र जा.क्र.सावाडी/रेशा/रा.म.मा.६६/मुल्यांकन/२०२१/२८४९, दि.११/०८/२०२१ अन्वये संपादित जमिनीवरील बांधकाम मुल्यांकन अहवाल

११. उपअधिक्षक भूमि अभिलेख, कुडाळ यांजकडील पत्र क्रमांक/भूमापन/रा.म.क्र.६६/ सं.मो.प व नकाशा/२०२१/७१२,दि.११/०६/२०२१ व पत्र क्र.भूसंपादन/ रा.म.मा.क्र.६६/दु.सं.मो./२०२१/१२८८,दि.०७/१०/२०२१,मो.र.नं.१९ अन्वये प्राप्त झालेले संयुक्त मोजणी पत्रक व नकाशाशीट

१२. सडक परिवहन व राजमार्ग मंत्रालय, नवी दिल्ली, भारत सरकार राजपत्र असाधारण भाग ॥ - खंड ३ — उपखंड (ii) अन्वये राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ चे कलम ३(A) पुरवणी अधिसूचना का.आ.१०८९(अ) प्रसिद्ध दि.१०/०३/२०२२

१३. कलम ३(A) नुसार अधिसूचना प्रसिद्धी राजपत्र दि.१०/०३/२०२२ व दैनिक प्रहार प्रहार व दैनिक रणझुंझार वृत्तपत्र दिनांक २२/०४/२०२२

१४. सडक परिवहन व राजमार्ग मंत्रालय, नवी दिल्ली, भारत सरकार राजपत्र असाधारण भाग ॥ - खंड ३ — उपखंड (ii) अन्वये राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ चे कलम ३(D)पुरवणी अधिसूचना का.आ.३६८४(अ)प्रसिद्ध दि.०४/०८/२०२२

१५. उपविभागीय कृषी अधिकारी, सावंतवाडी यांजकडील पत्र जाक्र/उविकृअसा/फळमुल्यां/अहवाल/१४३०/२०२२,दि.०१/१२/२०२२ अन्वये संपादीत जमिनीवरील फळझाडे मुल्यांकन अहवाल.

१६. सह दुय्यम निबंधक वर्ग-२ सिंधुदुर्ग यांचेकडील पत्र जा.क्र.सहदुनिसिं/४०६, दि.१५/१२/२०२२

भारत सरकार साठी करावयाच्या भूसंपादना करिता राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ चे (१९५६ चा कायदा ४८) कलम ३G अन्वये श्रीम. ऐश्वर्या काळुशे, उपविभागीय अधिकारी (महसूल), कुडाळ यांनी तयार केलेला निवाडा.

**भूसंपादन निवाडा**

क्र.उविअ/रा.म.मा.६६/भूसं.एसआर नं.७/पावशी/२०२३
सक्षम प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (महसूल),
कुडाळ, दिनांक : २२/०५/२०२३.

भारत सरकार साठी लागू असलेले भूसंपादन राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ चे (१९५६ चा कायदा ४८) कलम ३G अन्वये निवाडा

विषय :- भूसंपादन जिल्हा सिंधुदुर्ग.
भारतीय राष्ट्रीय राजमार्ग क्र.६६ चौपदरीकरणासाठी भूसंपादन
मौजे-पावशी (पुरवणी निवाडा क्र.२), ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग.

१) भूसंपादन प्रस्ताव :-

प्रस्तुत प्रकरणी संपादन संस्था कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, रत्नागिरी असून, भूसंपादन मोबदला निधी न्यायालय खर्च तसेच तद्अनुषंगीक इतर सर्व खर्च देणेसाठी संपादन संस्था म्हणून कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, रत्नागिरी यांचेवर बंधनकारक होईल.

१) कलम ३ (a) अधिसूचना :-

राष्ट्रीय महामार्ग क्र.६६ राजापुर ते झाराप (किमी-३५१/००० ते ४५०/१७०) विस्तारीत करण्यासाठी नामनिर्देशन करणेसाठी मा. जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांचे पत्र.क्र. १६०२६/१४०/२०१३-COLL-REV, दि.१९/०९/२०१३ अन्वये भूसंपादन प्रक्रिया पार पाडण्याकरीता उपविभागीय अधिकारी (महसूल), कुडाळ यांचे नामनिर्देशन अधिसूचीत करणेसाठी कळविणेत आले होते. त्यानुसार राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ कलम ३(a) अन्वये राज्यमार्ग मंत्रालय व सडक परिवहन विभाग, भारत सरकार, नवी दिल्ली यांचेकडील क्र.का.आ.३९ (अ) अधिसूचना प्रसिद्धी दिनांक ०७/०१/२०१४ अन्वये राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ करीता उपविभागीय अधिकारी (महसूल), कुडाळ यांची सक्षम प्राधिकारी म्हणून नेमणूक केली आहे.

२) सक्षम प्राधिकारी :-

भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांजकडील पत्रान्वये राष्ट्रीय महामार्ग क्र.६६ (जुना १७) राजापूर ते झाराप (कि.मी. ३५१/००० ते ४५०/१७०) हद्दी मधील मौजे कसाल ते झाराप तालुका कुडाळ पर्यंतच्या रस्त्याचे रुंदीकरण, चौपदरीकरण करणेसाठी भूसंपादन प्रक्रिया पुर्ण करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून उपविभागीय अधिकारी (महसूल), कुडाळ यांना प्राधिकृत केलेले आहे.

३) प्रस्ताव :-

कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, रत्नागिरी यांचेकडील पत्र जा.क्र.रामवि/रत्ना/पीबी/पीओ-१/६३७, दि.१५/०२/२०२० अन्वये राष्ट्रीय महामार्ग क्र.६६ च्या रूंदीकरणासाठी आवश्यक जमिनीचा मौजे- पावशी, ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग या गावातील भूसंपादन प्रस्ताव प्राप्त झालेला आहे.

४) कलम ३ (A) अधिसूचना :-

राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ चे कलम ३ (A) पुरवणी अधिसूचना सडक परिवहन व राजमार्ग मंत्रालय, नवी दिल्ली, भारत सरकार, राजपत्र असाधारण भाग II - खंड ३ — उपखंड (ii) अन्वये का.आ.१०८९ (अ), दि.१०/०३/२०२२ रोजी प्रसिद्ध झाली आहे. सदर अधिसूचना सिंधुदुर्ग जिल्हातील दोन स्थानिक वृत्तपत्रात व शासकीय कार्यालयात खालीलप्रमाणे प्रसिद्ध करण्यात आली.

| अ.क्र. | वृत्तपत्र व प्रसिद्धी कार्यालयाचे नाव | प्रसिद्धीचा दिनांक |
|---|---|---|
| १ | स्थानिक वृत्तपत्र ' दैनिक प्रहार' | २२/०४/२०२२ |
| २ | स्थानिक वृत्तपत्र ' दैनिक रणझुंझार॰ | २२/०४/२०२२ |
| ३ | उपविभागीय अधिकारी (महसूल), कुडाळ कार्यालय नोटीस बोर्डावर | २३/०३/२०२२ |
| ४ | जिल्हाधिकारी कार्यालय नोटीस बोर्डवर | ०२/०५/२०२२ |
| ५ | तहसिल कार्यालय, कुडाळ नोटीस बोर्डवर | १०/०५/२०२२ |
| ६ | तलाठी सजा पावशी नोटीस बोर्डवर | ०६/०४/२०२२ |
| ७ | उपअभियंता, राष्ट्रीय महामार्ग उपविभाग, सावंतवाडी | २६/०३/२०२२ |
| ८ | संपादन संस्था, कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, रत्नागिरी कार्यालय नोटीस बोर्डावर | २२/०३/२०२२ |

५) कलम ३ (C) नुसार चौकशी :-

राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ (१९५६ चा कायदा ४८) चे कलम ३A (१) अन्वये पुरवणी अधिसुचना दिनांक १०/०३/२०२२ राजपत्रात व स्थानिक वर्तमानपत्रात दिनांक २२/०४/२०२२ रोजी प्रसिद्ध झाल्यानंतर या अधिनियमाच्या कलम ३-C (१) अन्वये २१ दिवसांत जमिनधारक हितसंबंधित व्यक्तींनी हरकती दाखल करणेसाठी कळविण्यात आले होते. त्या अनुषंगाने हितसंबंधीतांकडुन कोणत्याही हरकती विहित मुदतीत प्राप्त झालेल्या नाहीत. सबब राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ कलम ३D अन्वये कार्यवाही करण्यासाठी सविस्तर अहवाल कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, रत्नागिरी यांजकडे दि.१५/०७/२०२२ रोजी पाठविणेत आला.

६) कलम ३ (D) अधिसूचना :-

सडक परिवहन व राजमार्ग मंत्रालय, नवी दिल्ली, भारत सरकार, राजपत्र असाधारण भाग ॥- खंड ३ — उपखंड (ii) अन्वये राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ कलम ३(D) अधिसूचना का.आ.३६८४(अ) प्रसिद्धी दि.०४/०८/२०२२.

७) कलम ३ (D) नुसार अधिसूचना प्रसिद्धी :-

परिच्छेद ४ मध्ये नमूद केलेले अहवाल कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, राष्ट्रीय महामार्ग रत्नागिरी यांनी भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, सडक परिवहन राज्यमार्ग मंत्रालय, नवी दिल्ली यांच्याकडे राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ चे कलम ३D नुसार अधिसूचना प्रसिद्ध करण्यासाठी अहवाल सादर केला. त्यानुसार सडक परिवहन व राजमार्ग मंत्रालय, नवी दिल्ली, भारत सरकार, राजपत्र असाधारण भाग ॥- खंड ३ — उपखंड (ii) अन्वये राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ चे कलम ३(D) अधिसूचना का.आ.३६८४(अ), दि.०४/०८/२०२२ रोजी प्रसिद्ध केली. संयुक्त मोजणी पत्रकामध्ये दर्शविलेप्रमाणे **एकूण ०.१८.४० हे.आर.** प्रस्तावित क्षेत्र असून, राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ चे कलम ३(D) अन्वये अधिसूचित करणेत आलेल्या व अंतिमरित्या **एकूण ०.१८.४० हे.आर क्षेत्र** संपादित करावयाच्या जमिनीचा तपशिल सोबत परिशिष्ट-१ मध्ये देण्यात आलेला आहे. सदर अधिसूचना सिंधुदुर्ग जिल्हातील दोन स्थानिक वृत्तपत्रात व शासकीय कार्यालयात प्रसिद्ध करण्यात आली आहे.

| अ.क्र. | वृत्तपत्र व प्रसिध्दी कार्यालयाचे नांव | प्रसिध्दी दिनांक |
|---|---|---|
| १ | दैनिक -सिंधुदुर्ग रत्नागिरी टाईम्स॰ (मराठी/इंग्रजी) | ३०/०८/२०२२ |
| २ | दैनिक -प्रहार॰ (मराठी/इंग्रजी) | ३०/०८/२०२२ |
| ३ | उपविभागीय अधिकारी (महसूल), कुडाळ कार्यालय नोटीस बोर्डावर | १९/०८/२०२२ |
| ४ | जिल्हाधिकारी कार्यालय नोटीस बोर्डावर | ०१/०८/२०२२ |
| ५ | तहसिलदार कार्यालय, कुडाळ नोटीस बोर्डावर | २२/०८/२०२२ |
| ६ | तलाठी कार्यालय, पावशी नोटीस बोर्डावर | २५/०८/२०२२ |
| ७ | उपअभियंता, राष्ट्रीय महामार्ग उपविभाग, सावंतवाडी | २४/०८/२०२२ |
| ८ | संपादन संस्था, कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, रत्नागिरी कार्यालय नोटीस बोर्डावर | ०८/०८/२०२२ |

८) कलम ३ (G) ३ नोटीस व चौकशी :-

संपादित जमिनीत हितसंबंधित असणा-या सर्व हितसंबंधित व्यक्तिींना उक्त दोन वृत्तपत्राद्वारे राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ चे कलम ३G पोट कलम ३ अन्वये हितसंबंधितांच्या असणा-या हक्कांचे स्वरुप व नुकसान भरपाई संदर्भातील त्यांच्या मागण्या संबंधीचे निवेदन घेवून दि.०८/०९/२०२२ रोजी उपविभागीय अधिकारी (महसूल), कुडाळ यांचे कार्यालयात उपस्थित रहाण्याबाबत दैनिक रणझुंझार व दैनिक प्रहार वृत्तपत्रामध्ये प्रसिध्दी देण्यात आली होती. सदर तारखांना एकही हरकती/दावा प्राप्त झालेला नाही.

९) संयुक्त मोजणी :-

राष्ट्रीय महामार्ग क्र.६६ रस्ता रुंदीकरण मौजे — पावशी, ता.कुडाळ येथील भूसंपादन प्रस्तावातील जमिनीची संयुक्त मोजणी उपअधिक्षक, भूमि अभिलेख, कुडाळ व संपादन संस्थेचे प्रतिनीधी यांनी केली आहे. सदर मोजणी नुसार मौजे — पावशी, ता.कुडाळ येथील **एकूण ०.१८.४० हे.आर.** जमीन संपादित होत आहे. प्रस्तावीत क्षेत्राची कलम ३A प्रमाणे पुरवणी अधिसूचना मंजूर झालेली असून, त्याची कलम ३D पुरवणी अधिसूचना **एकूण ०.१८.४० हे.आर.** क्षेत्र या निवाडयात समाविष्ठ करणेत आलेले आहे. संयुक्त मोजणी पत्रक व नकाशाशीट या कार्यालयाकडे त्यांचेकडील पत्र क्रमांक/भूमापन/ रा.म.क्र.६६/सं.मो.प व नकाशा/२०२१/७१२, दि.११/०६/२०२१ व पत्र क्र.भूसंपादन/रा.म.मा. क्र.६६/दु.सं.मो./२०२१/१२८८, दि.०७/१०/२०२१ अन्वये पुढील कार्यवाहीसाठी प्राप्त झालेले आहेत. उप अधिक्षक भूमी अभिलेख, कुडाळ व संपादन संस्थेचे प्रतिनिधी यांनी प्रमाणित केल्याप्रमाणे सर्वे नंबर / गट नंबर व क्षेत्र मान्य करण्यात आले आहे.

परिशिष्ठ - अ

भूसंपादन प्रस्ताव क्रमांक ७/२०१४, गांव — पावशी (पुरवणी निवाडा क्र.२), तालुका - कुडाळ

| अ.नं. | संयुक्त मोजणी प्रमाणे क्षेत्र (हे.आर) | | मागिल मुळ निवाडयात समाविष्ठ करणेत आलेले क्षेत्र (हे.आर) | | मागिल पुरवणी निवाडा क्र.१ मध्ये समाविष्ठ करणेत आलेले क्षेत्र (हे.आर) | | (पुरवणी क्र.२) कलम 3A नुसार प्रसिध्द झालेले क्षेत्र (हे.आर) | | (पुरवणी क्र.२) कलम 3D नुसार प्रसिध्द झालेले क्षेत्र (हे.आर) | | (पुरवणी क्र.२) सदरच्या निवाडयामध्ये समाविष्ठ करावयाचे क्षेत्र (हे.आर) | | अतिरिक्त प्रस्तावीत क्षेत्र (हे.आर) | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | स.नं./हि.नं | क्षेत्र | स.नं./हि.नं | क्षेत्र | स.नं./हि.नं | क्षेत्र | स.नं./हि.नं | क्षेत्र | स.नं./हि.नं | क्षेत्र | स.नं./हि.नं | क्षेत्र | स.नं./हि.नं | क्षेत्र | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १६ | १७ | १८ |
| | एकूण | ०.१८.४० | एकूण | - | एकूण | - | एकूण | ०.१८.४० | एकूण | ०.१८.४० | एकूण | ०.१८.४० | - | - | |
| १ | ८९अ/२अ पै | ०.०१.७० | - | - | - | - | ८९अ/२अ पै | ०.०१.७० | ८९अ/२अ पै | ०.०१.७० | ८९अ/२अ पै | ०.०१.७० | - | - | |
| २ | ८९अ/५ पै | ०.००.१५ | - | - | - | - | ८९अ/५ पै | ०.००.१५ | ८९अ/५ पै | ०.००.१५ | ८९अ/५ पै | ०.००.१५ | - | - | |
| ३ | ८९अ/६ अ पै | ०.०१.२० | - | - | - | - | ८९अ/६ अ पै | ०.०१.२० | ८९अ/६ अ पै | ०.०१.२० | ८९अ/६ अ पै | ०.०१.२० | - | - | |
| ४ | ८९अ/१०अ पै | ०.०१.८० | - | - | - | - | ८९अ/१०अ पै | ०.०१.८० | ८९अ/१०अ पै | ०.०१.८० | ८९अ/१०अ पै | ०.०१.८० | - | - | |
| ५ | ८९अ/१७ पै | ०.०१.३० | - | - | - | - | ८९अ/१७ पै | ०.०१.३० | ८९अ/१७ पै | ०.०१.३० | ८९अ/१७ पै | ०.०१.३० | - | - | |
| ६ | ८९अ/१८ अ | ०.००.९० | - | - | - | - | ८९अ/१८ अ | ०.००.९० | ८९अ/१८ अ | ०.००.९० | ८९अ/१८ अ | ०.००.९० | - | - | |
| ७ | ८९अ/२३ पै | ०.००.१० | - | - | - | - | ८९अ/२३ पै | ०.००.१० | ८९अ/२३ पै | ०.००.१० | ८९अ/२३ पै | ०.००.१० | - | - | |
| ८ | ८९अ/२४ पै | ०.००.७५ | - | - | - | - | ८९अ/२४ पै | ०.००.७५ | ८९अ/२४ पै | ०.००.७५ | ८९अ/२४ पै | ०.००.७५ | - | - | |
| ९ | ८९अ/२८अ पै | ०.०१.३० | - | - | - | - | ८९अ/२८अ पै | ०.०१.३० | ८९अ/२८अ पै | ०.०१.३० | ८९अ/२८अ पै | ०.०१.३० | - | - | |
| १० | ८९अ/३२ | ०.००.५० | - | - | - | - | ८९अ/३२ | ०.००.५० | ८९अ/३२ | ०.००.५० | ८९अ/३२ | ०.००.५० | - | - | |

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ११ | ८९अ/३४ | ०.००.५० | - | - | - | - | ८९अ/३४ | ०.००.५० | ८९अ/३४ | ०.००.५० | ८९अ/३४ | ०.००.५० | - | - | |
| १२ | ८९अ/३५अ | ०.००.६० | - | - | - | - | ८९अ/३५अ | ०.००.६० | ८९अ/३५अ | ०.००.६० | ८९अ/३५अ | ०.००.६० | - | - | |
| १३ | ८९अ/३६ पै | ०.०१.६५ | - | - | - | - | ८९अ/३६ पै | ०.०१.६५ | ८९अ/३६ पै | ०.०१.६५ | ८९अ/३६ पै | ०.०१.६५ | - | - | |
| १४ | ८९अ/३७ पै | ०.००.३० | - | - | - | - | ८९अ/३७ पै | ०.००.३० | ८९अ/३७ पै | ०.००.३० | ८९अ/३७ पै | ०.००.३० | - | - | |
| १५ | ८९अ/३८अ | ०.००.२० | - | - | - | - | ८९अ/३८अ | ०.००.२० | ८९अ/३८अ | ०.००.२० | ८९अ/३८अ | ०.००.२० | - | - | |
| १६ | ८९अ/३९ पै | ०.००.३० | - | - | - | - | ८९अ/३९ पै | ०.००.३० | ८९अ/३९ पै | ०.००.३० | ८९अ/३९ पै | ०.००.३० | - | - | |
| १७ | ८९अ/४२ पै | ०.०१.४५ | - | - | - | - | ८९अ/४२ पै | ०.०१.४५ | ८९अ/४२ पै | ०.०१.४५ | ८९अ/४२ पै | ०.०१.४५ | - | - | |
| १८ | ८९अ/४३ अ | ०.००.४० | - | - | - | - | ८९अ/४३ अ | ०.००.४० | ८९अ/४३ अ | ०.००.४० | ८९अ/४३ अ | ०.००.४० | - | - | |
| १९ | ८९अ/४५ अ | ०.०१.३० | - | - | - | - | ८९अ/४५ अ | ०.०१.३० | ८९अ/४५ अ | ०.०१.३० | ८९अ/४५ अ | ०.०१.३० | - | - | |
| २० | ८९अ/४६ अ | ०.००.५० | - | - | - | - | ८९अ/४६ अ | ०.००.५० | ८९अ/४६ अ | ०.००.५० | ८९अ/४६ अ | ०.००.५० | - | - | |
| २१ | ८९अ/४७ | ०.००.५० | - | - | - | - | ८९अ/४७ | ०.००.५० | ८९अ/४७ | ०.००.५० | ८९अ/४७ | ०.००.५० | - | - | |
| २२ | ८९अ/४८ अ | ०.०१.०० | - | - | - | - | ८९अ/४८ अ | ०.०१.०० | ८९अ/४८ अ | ०.०१.०० | ८९अ/४८ अ | ०.०१.०० | - | - | |
| एकूण | | ०.१८.४० | - | - | - | - | - | ०.१८.४० | - | ०.१८.४० | - | ०.१८.४० | - | - | |

९) वरील प्रपत्रातील ३(D) प्रमाणे संपादन करावयाचे स.नं./हि.नं. व क्षेत्र रकाना क्र.१० व ११ प्रमाणे आहे.

(परिशिष्ट - १)

| अ.क्र. | एस.आर.क्र. | गावाचे नांव | एकूण संपादित क्षेत्र हे.आर. | | मोजणी रजिस्टर नं. |
|---|---|---|---|---|---|
| १ | ७/२०१४ | पावशी | खरीप<br>वरकस | ०.१५.३५<br>०.०३.०५ | ९/२०२० |
| | | | एकूण | ०.१८.४० | |

१०) मालकी हक्क व स्थळ पहाणी :—

राष्ट्रीय महामार्ग क्र.६६ कसाल ते झाराप हद्दी मधील मौजे पावशी, ता.कुडाळ रस्त्याचे रूंदीकरण, चौपदरीकरणासाठी कलम ३ (D) अधिसूचना, संयुक्त मोजणी अहवाल जायमोक्यावर स्थळपहाणी मौजे पावशी दि.२५/०९/२०२० रोजी करणेत आली. संपादित होणाऱ्या जमिनीची मालकी निश्चित करण्यासाठी संबंधीत जमिनीच्या अधिकार अभिलेखातील (७/१२) नोंदी ग्राह्य धरण्यात आल्या आहेत. मालकी हक्क व नुकसान भरपाई बाबत हरकती निर्माण झाल्यास त्यावर राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ कलम ३ H (४) प्रमाणे कार्यवाही करणेत येईल. उक्त अधिनियमाचे कलम ३D व संयुक्त मोजणीचे वेळी मालकी हक्काबाबतचे दस्त ऐवज विचारात घेण्यात आले आहे. तथापी काही मालमत्ते संदर्भात मालकी हक्क शाबितीचा वाद उद्भवल्यास मालकी हक्काबाबत सक्षम न्यायालय जो आदेश देईल त्या आदेशानुसार नुकसान भरपाई वाटप करण्यात येईल.

११) आक्षेप व मागण्या :-

प्रस्ताव पाठविणाऱ्या संस्थेकडुन कुठल्याही प्रकारची मागणी किंवा आक्षेप नाही. तसेच बाधीत शेतकऱ्यांचे संयुक्त मोजणी संबंधी व जमिनीच्या मुल्यांकनासंबंधी सबळ पुराव्यासह राष्ट्रीय महामार्ग अधिनियम कलम ३A व ३G संदर्भाने एकही आक्षेप आला नाही. त्या अनुषंगाने मौजे पावशी, ता. कुडाळ येथील प्रकरणात या कार्यालयाने कलम ३G च्या आक्षेप सुनावणी घेण्याचा प्रश्न उद्भवला नाही. त्यावेळी व त्यानंतर कोणतेही सबळ पुरावे दाखल झाले नाहीत.

१२) बाजार मुल्य (Market Value) निश्चित करणे -

राष्ट्रीय महामार्ग क्र.६६ च्या रुंदीकरण/चौपदरीकरणासाठी लागणाऱ्या जमिनीचे भूसंपादन हे राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ मधील तरतूदीप्रमाणे करणेत येत आहे. सदर संपादीत जमिन राष्ट्रीय राज्य महामार्ग क्र.६६ (जुना १७) मुंबई ते गोवा रोडच्या लगत असल्याने रहिवास व्यापार व औद्योगिक दृष्टया महत्वाचे आहे. हायवेलगतच्या जमिनीचे महत्व रस्त्यावरील सोई सुविधा या दृष्टीकोनातून वाढत आहेत. संपादनाखालील सर्व जमिनी हायवेमार्गावरील व लगत असल्याने त्याचे मुल्यांकन निश्चित करताना हायवे मार्गालगतच्या जमिनीचे शेती, रहिवास, व्यापार, औद्योगिक वापर या दृष्टीकोनातून महत्व विचारात घेणे

आवश्यक आहे. तसेच अधिकृत व संभाव्य बिनशेती क्ष्ामता व ७/१२ वरून खरीप, हंगामी बागायत व अकृषिक जमिनीबाबत इत्यादींचा विचार करणे आवश्यक आहे.

१३) जमिनीचे दर :-

मौजे पावशी, ता. कुडाळ, जि. सिधुदुर्ग या गावचे शिघ्रसिद्ध गणक दर ग्रामिण क्षेत्रातील माहिती तक्त्यामध्ये सदरचा गांव मुल्यविभाग क्र.६ तपशिलाप्रमाणे मुल्यदर तक्त्यामध्ये शेतसारी हेक्टरी आकारणीनुसार (गटानुसार) प्रति हेक्टरी जिरायत शेत जमिनीचे दर दिलेले आहेत. खरीप अथवा वरकस तसेच हंगामी बागायतीसाठी दर दिले नसल्यास जिराईत शेतजमिनीच्या भातशेती/खरीप जमिनीस दिडपट, जिरायत जमिनीच्या डोंगरी बागायत जमिनीस दुप्पट, वरकस जमिनीस जिराईत जमिनीच्या ७५% दर विचारात घेणेबाबत सुचना आहेत.

मौजे-पावशी, ता.कुडाळ येथील जमिनी राष्ट्रीय महामार्ग रुंदीकरणासाठी संपादित होत असून, सदर गाव कुडाळ या तालुक्याचे ठिकाणापासून ५ कि.मी. च्या आत आहे. कुडाळ नगरपंचायत व रेल्वे स्टेशनपासून ७ कि.मी. अंतराच्या आत आहे. सिंधुदुर्ग जिल्हा पर्यटन जिल्हा म्हणून घोषित असून, गोवा या पर्यटन दृष्टया जागतिक महत्व असलेल्या राज्याला लागून आहे. पावशीपासून सुमारे २५ कि.मी. अंतरावर चिपी विमानतळ आहे. तसेच लगतच्या मालवण तालुक्यामध्ये - समुद्रविश्व प्रकल्प ॰ नावारूपाला येत आहे. जवळच कुडाळ येथे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ औद्योगिक प्रकल्प आहेत. व्यापक औद्योगिक क्षमता असून, महामार्ग भोवतालच्या क्षेत्रात येवू घातलेल्या हॉटेल, व्यवसाय, उद्योग धंद्यामुळे महामार्ग लगतच्या सर्व जमिनींना अनन्य साधारण महत्व आले आहे. व या सर्व क्षेत्रातील शेतजमिनी देखील अमर्याद अकृषिक संभावनांच्या क्षमता धारण करतात.

राष्ट्रीय महामार्ग क्र.६६ साठी प्रस्तुत संपादित क्षेत्र हे महामार्गाच्या दुतर्फा आहे. जमिनीस व्यापक औद्योगिक व अकृषिक क्षमता आहे. सदर जमिनी या हायवेलगत असल्याने हायवेलगताच्या जमिनीचा दर देणे योग्य होईल. मौजे-पावशी, ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग या गावचे शिघ्रसिद्ध गणक दर ग्रामीण क्षेत्रात विभाग ६ मध्ये मोडत आहेत. विभाग ६ मधील मुल्यविभागाच्या माहिती तक्त्यामध्ये हायवेवरील जमिनीचा प्रतिआर दर रु.१,३२,०००/- एवढा आहे.

मौजे — पावशी मधील सर्व प्रकारच्या जमिनीसाठी खरीप व वरकस जमिन ग्रुप क्र.१,२,३,४,५,६ व ७ साठी दरांची माहिती खालीलप्रमाणे आहे.

<u>मौजे — पावशी येथील जमिनीचा प्रतीआर दर तक्ता व माहिती.</u>

| अ. क्र. | जमिनीचा प्रकार | संपादित होणाऱ्या जमीनीचे स.नं./हि.नं. | गटाचे एकूण क्षेत्र हे.आर.) | आकार | ग्रुप क्र. | दर रूपये प्रतिआर |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | जिरायत शेत जमिन | ८९अ/२अ पै, ८९अ/५ पै, ८९अ/६अ पै | ०.०३.०५ | ० ते १.२५ | १ | ५११० |
| २ | जिरायत शेत जमिन | -- | -- | १.२६ ते २.५० | २ | ६६०४ |
| ३ | जिरायत शेत जमिन | -- | -- | २.५१ ते ५.०० | ३ | ६८६२ |
| ४ | जिरायत शेत जमिन | ८९अ/१०अ पै, ८९अ/१७ पै, ८९अ/१८अ, ८९अ/२८अ पै, ८९अ/३२, ८९अ/३४, ८९अ/३५अ, ८९अ/३६ पै, ८९अ/३७ पै, ८९अ/३९ पै, ८९अ/४२ पै, ८९अ/४३अ, ८९अ/४५अ, ८९अ/४६अ, ८९अ/४७, ८९अ/४८अ | ०.१३.७५ | ५.०१ ते ७.५० | ४ | ८१०७ |
| ५ | जिरायत शेत जमिन | ८९अ/२३ पै, ८९अ/२४ पै, ८९अ/३८अ | ०.०१.६० | ७.५१ ते १०.०० | ५ | १०४६४ |
| ६ | जिरायत शेत जमिन | -- | -- | १०.०१ ते १२.५० | ६ | १२१३२ |
| ७ | जिरायत शेत जमिन | -- | -- | १२.५१ च्या पुढे | ७ | १२८६८ |
| ८ | बिनशेती जमिनी | -- | -- | -- | - | -- |
| ९ | हायवे लगत जमिनी | ८९अ/२अ पै, ८९अ/५ पै, ८९अ/६अ पै, ८९अ/१०अ पै, ८९अ/१७ पै, ८९अ/१८अ, ८९अ/२३ पै, ८९अ/२४ पै, ८९अ/२८अ पै, ८९अ/३२, ८९अ/३४, ८९अ/३५अ, ८९अ/३६ पै, ८९अ/३७ पै, ८९अ/३८अ, ८९अ/३९ पै, ८९अ/४२ पै, ८९अ/४३अ, ८९अ/४५अ, ८९अ/४६अ, ८९अ/४७, ८९अ/४८अ | ०.१८.४० | -- | - | १३२००० |

१३A) खरेदी विक्री प्रमाणे दर :-

सदरची जमीन राष्ट्रीय महामार्ग क्र.६६ चे रस्ता रुंदीकरणासाठी संपादन करण्यात येत आहे. संपादित जमिनीचे मुल्यांकन निश्चित करण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ चे कलम ३A अधिसूचना Minishtry of Road Transport and Highway Notification New Delhi S.O.१०८९ (अ) दि.१०/०३/२०२२ रोजी प्रसिध्दी केली आहे. मुल्यांकनासाठी दि.१०/०३/२०२२ ही तारीख आधारभूत धरण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनाकडील पत्र क्र.NHAI/११०१३/dgm (L.A & Coord) २०१५/FTS-४१७/७०६८९, दि.२४/०८/२०१५ व पत्र क्र.संकिर्ण-१०/२०१५/प्र.क्र.१३३/अ-२, दि.०५/१०/२०१५ अन्वये कळविणेत आलेप्रमाणे राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ नुसार संपादित करावयाच्या जमिनीसंदर्भात मुल्यांकन करताना नवीन भूसंपादन कायद्यातील फक्त मोबदला परिगणित करण्याबाबतच्या कलम २६ ते

३० च्या तरतूदी लागू असून, उर्वरित कार्यपध्दती ही राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ च्या तरतूदीनुसार करणे अपेक्षित आहे, असे कळविणेत आल्याने सदर तारखेपासूनचे मागील तीन वर्षाचे मौजे- पावशी या गावाचे खरेदी विक्री व्यवहार सह दुय्यम निबंधक वर्ग- २, सिंधुदुर्ग यांजकडून या कार्यालयाकडील पत्र क्र.उविअ/भूसं/ रा.म.मा.क्र.६६/INDEX-II/२०२२, दि.२२/०८/२०२२ रोजी सन २०१९, २०२० व २०२१ या वर्षीचे खरेदी विक्री व्यवहार मागविण्यात आलेले आहेत. त्यानुसार सह दुय्यम निबंधक वर्ग- २, सिंधुदुर्ग यांचेकडील पत्र जा.क्र.सहदुनिसि/सूची-२/३१५, दि.१४/०९/२०२२ रोजीच्या पत्रान्वये मागील तीन वर्षात मौजे- पावशी या गावी ३ खरेदी विक्री व्यवहार झालेला आहे. त्यापैकी अकृषिक-१, घरपरडे/काजु कलमे-१, खरीप/वरकस-१ खरेदी विक्री व्यवहार झालेले आहे.

**खरेदी विक्री व्यवहारांचे विवरण.**

| अ.क्र. | परिशिष्ट अ मधील अ.नं. | प्रकार | स.नं./हि.नं. | खरेदी क्षेत्र | आकार | जमीनीची प्रत | विक्रीचा दिनांक | खरेदी किंमत | प्रतिआर दर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ५२८/२०१९ | साठेखत | ३ब/४१/४६ | ०.०४.३२ | - | अकृषिक | ०६/०३/२०१९ | ५,००,०००/- | १,१५,७४१/- |
| २ | ५५८/२०२० | खरेदीखत | ३६अ/४ | ०.२०.०० | ०.०३ | घरपरडे/ काजुकलम | ०६/०३/२०२० | २०,०००/- | १,०००/- |
| ३ | ६७७/२०२१ | साठेखत | ९२/१/३<br>९२/२<br>९४/६<br>९४/७अ<br>९४/८ | ०.०९.००<br>०.०५.००<br>०.०७.१०<br>०.११.७०<br>०.०१.५० | ०.०४<br>०.०२<br>०.०८<br>०.१७<br>०.०३ | खरीप<br>खरीप<br>वरकस<br>वरकस<br>खरीप | ०८/०३/२०२१ | ४६,००,०००/- | १,३४,१११/- |
| | | | एकूण | ०.३४.३० | | | | | |

वरीलप्रमाणे एकूण ३ खरेदी-विक्री व्यवहार असून, त्यापैकी १ अकृषिक प्रतीचा आहे. घरपरडे/काजुकलम १ असा संमिश्र प्रतीचा खरेदी-विक्री व्यवहार आहे. तसेच खरीप/वरकस असा संमिश्र प्रतीचा खरेदी-विक्री व्यवहार आहे. संयुक्त मोजणी पत्रकात अकृषिक क्षेत्र संपादित नाही. त्यामुळे वरील तीन्ही व्यवहार विचारात घेण्यात आलेले नाहीत.

प्रस्तुत भूसंपादन प्रकरणी संयुक्त मोजणी पत्रकातील नोंदी पाहता प्रस्तावीत क्षेत्रात पोट खराबा क्षेत्राचा समावेश आहे. विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांजकडील पत्र क्र.जा.क्र.नर/निवाडा शाखा/पो.ख/धारणा कायम/२०१६/१४२, दि.१९/१०/२०१६ अन्वये कळविणेत आलेप्रमाणे पोटखराबा जमिनीचे बाजारमुल्य परिगणित करताना बाजारमुल्य दर तक्यातील मार्गदर्शक सुचनाप्रमाणे लागु करणे आवश्यक आहे.

१३B) शिघ्रसिध्द गणक पध्दतीने येणारा दर —

सह जिल्हा निबंधक वर्ग-१ (नि.श्रे.), सिंधुदुर्ग यांचेकडून ०१/०१/२०२२ ते ३१/१२/२०२२ या कालावधीचे शिघ्रसिध्द गणकाचे दर व मार्गदर्शक सुची या कार्यालयाकडील पत्र क्र.उविअ/भूसं/रा.म.मा.क्र.६६/शिघ्रसिध्द गणक दर/२०२२, दि.२२/०८/२०२२ अन्वये मागविणेत आलेले होते. त्यानुसार सह दुय्यम निबंधक वर्ग-२, सिंधुदुर्ग यांचेकडील पत्र जा.क्र.सहदुनिसिं/४०६,

दि.१५/१२/२०२२ अन्वये शिघ्रसिध्द गणकाचे दर नोंदणी महानिरीक्षक, मुद्रांक नियंत्रक व महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडील सन २०२२ चे दर प्राप्त झाले. मौजे पावशी, ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग हा गाव शिघ्रसिध्द गणक तक्त्यात ग्रामीण क्षेत्रात विभाग-६ मध्ये मोडत आहे. जमिन दर निश्चित करतेवेळी कलम ३ A ची अधिसूचना प्रसिध्द झाली त्यावर्षांच्या शिघ्रसिध्द गणक सूचीप्रमाणे दराचा विचार करणेत यावा. अशी भूसंपादन कायद्यात तरतूद असल्याने सन २०२२ चे मुल्यांकन तक्याप्रमाणे विभागमुल्य प्रकारानुसार सदरचा गाव मुल्यविभाग ६ मध्ये मोडत असल्याने हेक्टरी शेतसारा आकारणीनुसार जिराईत जमिनीच्या भातशेती/खरीप जमिनीस दिडपट, वरकस जमिनीस जिराईत जमिनीच्या ७५% व व बाजारमुल्य तक्त्यातील मार्गदर्शक सुचनेप्रमाणे हेक्टरी शेतसारा आकारमान मुल्यदरानुसार व जमिनीच्या प्रकारानुसार पोटखराबासह सर्व क्षेत्र मुल्यांकनासाठी विचारात घ्यावे असे सुचित करणेत आलेले आहे. त्याप्रमाणे पोटखराबा जमिनीस वेगळा दर देय करणेत आलेला नाही.

शिघ्रसिध्द गणक दराप्रमाणे निश्चित केलेला दर

| अ.क्र. | गट क्रमांक | प्रति हेक्टरी शेतसारा | जमिनीचा प्रकार व दर प्रतिआर | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | जिरायत | खरीप | वरकस | हायवे लगतचे दर | बिनशेती दर |
| १ | १ | ० ते १.२५ | ५११० | ७६६५ | ३८३३ | १३२००० | ११६००० |
| २ | २ | १.२६ ते २.५० | ६६०४ | ९९०६ | ४९५३ | १३२००० | ११६००० |
| ३ | ३ | २.५१ ते ५.०० | ६८६२ | १०२९३ | ५१४७ | १३२००० | ११६००० |
| ४ | ४ | ५.०१ ते ७.५० | ८१०७ | १२१६१ | ६०८० | १३२००० | ११६००० |
| ५ | ५ | ७.५१ ते १०.०० | १०४६४ | १५६९६ | ७८४८ | १३२००० | ११६००० |
| ६ | ६ | १०.०१ ते १२.५० | १२१३२ | १८१९८ | ९०९९ | १३२००० | ११६००० |
| ७ | ७ | १२.५१ च्या पुढे | १२८६८ | १९३०२ | ९६५१ | १३२००० | ११६००० |

तुलनात्मक तक्ता

| अ. क्र. | खरेदी विक्री व्यवहार पद्धतीने हिशोबित केलेले प्रतीआर दर | शिघ्रसिद्ध पद्धतीने हिशोबित केलेले दर (प्रतीआर) | | | | या दोन्हीपैकी निवाडयात देय्य करणेत आलेला किफायतशीर दर (प्रतीआर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | | आकारमान गटाप्रमाणे येणारे दर | | | हायवेवरील जमिनी | |
| | | गट क्रमांक | खरीप | वरकस | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | -- | १ | ७६६५ | ३८३३ | १३२००० | १३२००० |
| २ | -- | ४ | १२१६१ | ६०८० | १३२००० | १३२००० |
| ३ | -- | ५ | १५६९६ | ७८४८ | १३२००० | १३२००० |

जमिनीचे बाजारमुल्य ठरविताना The Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement Act २०१३ चे कलम २६ नुसार वरील मुल्यांकनापैकी सर्वाधिक येणारे बाजारमुल्य दर हा निश्चित करणेकरिता मागील ३ वर्षांचे सरासरी खरेदी विक्री व्यवहार व सन २०२२ मधील मागविणेत आलेले होते. त्यानुसार ३ खरेदी विक्री व्यवहार प्राप्त झालेले आहेत. सदरचे सर्व खरेदी विक्री व्यवहार संमिश्र पध्दतीचे असल्याने निवाडयातुन वगळण्यात आलेले आहेत. शिघ्रसिध्द गणक पध्दतीनुसार आकारमान गटाप्रमाणे खरीप, वरकस जमीनीचे दर व हायवेवरील जमीनीचे दर यांची तुलना केली असता, हायवेवरील जमीनीचा प्रतिआर दर हा आकारमान गटानुसार जास्त असल्याने हायवेवरील जमीनीचा प्रतिआर दर १,३२,०००/- हा संपादित जमिनीच्या मुल्यांकनासाठी बाजारमुल्य म्हणून प्रस्तावित करणेत येत आहे.

## संपादित जमिनीचे अंतिम मुल्यांकन.

### भूसंपादन प्रस्ताव क्रमांक ७/२०१४, गांव — पावशी (पुरवणी निवाडा क्र.२), तालुका — कुडाळ

| अ.क्र. | स.नं./हि.नं. | एकूण संपादित जमिनीचे क्षेत्र (सं.मो.पत्रकाप्रमाणे) | | | | | आकार | पैकी 3D अधिसूचनेद्वारे प्रसिद्धी क्षेत्र | संपादित जमिनीचा प्रतीआर दर | संपादित जमिनीचा गुणांक १.०० प्रमाणे प्रती आर दर | एकूण जमिनीची किंमत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | खरीप | वरकस | अकृषिक | पो.ख. | एकूण | | | | | |
| १ | ८९अ/२अ पै | | ०.०१.३० | | ०.००.४० | ०.०१.७० | ०.०१ | ०.०१.७० | १३२०००.०० | १३२०००.०० | २२४४००.०० |
| २ | ८९अ/५ पै | | ०.००.१५ | | | ०.००.१५ | | ०.००.१५ | १३२०००.०० | १३२०००.०० | १९८००.०० |
| ३ | ८९अ/६ अ पै | | ०.००.९० | | ०.००.३० | ०.०१.२० | ०.०१ | ०.०१.२० | १३२०००.०० | १३२०००.०० | १५८४००.०० |
| ४ | ८९अ/१०अ पै | ०.०१.६० | | | ०.००.२० | ०.०१.८० | ०.०९ | ०.०१.८० | १३२०००.०० | १३२०००.०० | २३७६००.०० |
| ५ | ८९अ/१७ पै | ०.०१.२० | | | ०.००.१० | ०.०१.३० | ०.०७ | ०.०१.३० | १३२०००.०० | १३२०००.०० | १७१६००.०० |
| ६ | ८९अ/१८ अ | ०.००.९० | | | | ०.००.९० | ०.०६ | ०.००.९० | १३२०००.०० | १३२०००.०० | ११८८००.०० |
| ७ | ८९अ/२३ पै | ०.००.१० | | | | ०.००.१० | ०.०१ | ०.००.१० | १३२०००.०० | १३२०००.०० | १३२००.०० |
| ८ | ८९अ/२४ पै | ०.००.७५ | | | | ०.००.७५ | ०.०६ | ०.००.७५ | १३२०००.०० | १३२०००.०० | ९९०००.०० |
| ९ | ८९अ/२८अ पै | ०.०१.१० | | | ०.००.२० | ०.०१.३० | ०.०८ | ०.०१.३० | १३२०००.०० | १३२०००.०० | १७१६००.०० |
| १० | ८९अ/३२ | ०.००.५० | | | | ०.००.५० | ०.०३ | ०.००.५० | १३२०००.०० | १३२०००.०० | ६६०००.०० |
| ११ | ८९अ/३४ | ०.००.५० | | | | ०.००.५० | ०.०३ | ०.००.५० | १३२०००.०० | १३२०००.०० | ६६०००.०० |
| १२ | ८९अ/३५अ | ०.००.६० | | | | ०.००.६० | ०.०४ | ०.००.६० | १३२०००.०० | १३२०००.०० | ७९२००.०० |
| १३ | ८९अ/३६ पै | ०.०१.५५ | | | ०.००.१० | ०.०१.६५ | ०.०८ | ०.०१.६५ | १३२०००.०० | १३२०००.०० | २१७८००.०० |
| १४ | ८९अ/३७ पै | ०.००.३० | | | | ०.००.३० | ०.०२ | ०.००.३० | १३२०००.०० | १३२०००.०० | ३९६००.०० |
| १५ | ८९अ/३८अ | ०.००.२० | | | | ०.००.२० | ०.०२ | ०.००.२० | १३२०००.०० | १३२०००.०० | २६४००.०० |
| १६ | ८९अ/३९ पै | ०.००.३० | | | | ०.००.३० | ०.०२ | ०.००.३० | १३२०००.०० | १३२०००.०० | ३९६००.०० |
| १७ | ८९अ/४२ पै | ०.०१.४५ | | | | ०.०१.४५ | ०.०८ | ०.०१.४५ | १३२०००.०० | १३२०००.०० | १९१४००.०० |
| १८ | ८९अ/४३ अ | ०.००.४० | | | | ०.००.४० | ०.०३ | ०.००.४० | १३२०००.०० | १३२०००.०० | ५२८००.०० |
| १९ | ८९अ/४५ अ | ०.०१.३० | | | | ०.०१.३० | ०.०८ | ०.०१.३० | १३२०००.०० | १३२०००.०० | १७१६००.०० |
| २० | ८९अ/४६ अ | ०.००.५० | | | | ०.००.५० | ०.०३ | ०.००.५० | १३२०००.०० | १३२०००.०० | ६६०००.०० |
| २१ | ८९अ/४७ | ०.००.५० | | | | ०.००.५० | ०.०३ | ०.००.५० | १३२०००.०० | १३२०००.०० | ६६०००.०० |
| २२ | ८९अ/४८ अ | ०.००.९० | | | ०.००.१० | ०.०१.०० | ०.०६ | ०.०१.०० | १३२०००.०० | १३२०००.०० | १३२०००.०० |
| एकूण | | ०.१४.६५ | ०.०२.३५ | -- | ०.०१.४० | ०.१८.४० | | ०.१८.४० | | | २४२८८००.०० |

१४) फळझाडे मुल्यांकन -

प्रस्तुत प्रकरणी झालेल्या संयुक्त मोजणी पत्रकानुसार त्यामध्ये समाविष्ट असलेल्या फळझाडांचे जागेवरील वस्तुस्थितीनुसार मौजे पावशी गावच्या संपादीत होणाऱ्या जमिनीतील फळझाडांचे मुल्यांकन करून मुल्यांकन अहवाल पाठविण्यासाठी या कार्यालयाकडील पत्र क्र.उविअ/भूसं/रा.म.मा.क्र.६६/फळझाडे मुल्यांकने/०७/२०२२, दि.२७/०७/२०२२ व स्मरणपत्र क्र.उविअ/भूसं/रा.म.मा.क्र.६६/फळझाडे मुल्यांकने/०९/२०२२, दि.२३/०९/२०२२ अन्वये कळविण्यात आलेले आहे. त्यानुसार उपविभागीय कृषी अधिकारी, सावंतवाडी यांचेकडील पत्र जाक्र/ उविकृअसा/फळमुल्यां/अहवाल/१४३०/२०२२, दि.०१/१२/२०२२ अन्वये प्राप्त झालेला आहे. कृषी विभागामार्फत फळझाडांचे मुल्यांकन करून निवाडयात खालीलप्रमाणे समाविष्ट करणेत आले.

| अ.क्र. | स.नं./हि.नं./गट नंबर | संपादन येणाऱ्या फळझाडांची संख्या | | | | फळझाडांची मुल्यांकन अहवालाप्रमाणे रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| | | संयुक्त मोजणी पत्रका प्रमाणे | | फळ विभागाच्या मुल्यांकन अहवालाप्रमाणे | | |
| | | झाडांचा प्रकार | संख्या | झाडांचा प्रकार | संख्या | |
| १ | ८९अ/२ अ पै | नारळ | २ | नारळ | २ | २६६२६.२९ |
| | | नारळ रोपे | १ | नारळ रोपे | १ | १७१५.०० |
| | | सुपारी | १ | सुपारी | १ | १०५५.०१ |
| | | आंबा कलम रोपे | ३ | आंबा कलम रोपे | ३ | ८७००.०० |
| | | फणस | १ | फणस | १ | १५७५२.०७ |
| | | | | | | ५३८४८.३७ |
| २ | ८९अ/२४ पै | फणस | १ | फणस | १ | १५७५२.०७ |
| | | | | | | १५७५२.०७ |
| | एकूण रक्कम रुपये - | | | | | ६९६००.४४ |

१५) वनझाडे मुल्यांकन —

प्रस्तुत प्रकरणी संयुक्त मोजणीनुसार संपादित क्षेत्रात वनझाडे समाविष्ट नाहीत. त्यामुळे मुल्यांकन करणेचा प्रश्न उद्भवत नाही.

| अ.क्र. | स.नं./हि.नं./गट नंबर | संपादन येणाऱ्या वनझाडांची संख्या | | | | वनझाडांची मुल्यांकन अहवालाप्रमाणे रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| | | संयुक्त मोजणी पत्रकाप्रमाणे | | वन विभागाच्या मुल्यांकन अहवालाप्रमाणे | | |
| | | झाडांचा प्रकार | संख्या | झाडांचा प्रकार | संख्या | |
| नि रं क | | | | | | |

१६) बांधकामे मुल्यांकन —

प्रस्तुत प्रकरणी झालेल्या राष्ट्रीय महामार्ग क्र.६६ च्या संपादित असलेल्या क्षेत्रातील संयुक्त मोजणी नुसार त्यामध्ये समाविष्ट असलेल्या बांधकामे जागेवरील वस्तुस्थितीनुसार मुल्यांकन करून उपविभागीय अभियंता, राष्ट्रीय महामार्ग उपविभाग, सावंतवाडी यांचेकडील पत्र जा.क्र.सावाडी/रेशा/रा.म.मा.६६/मुल्यांकन/२०२१/२८४९, दि.११/०८/२०२१ अन्वये मौजे पावशी येथील बांधकाम मुल्यांकन अहवाल प्राप्त झालेला आहे. सदरच्या नोंदी या संपादित क्षेत्रात समाविष्ट असल्याने बांधकाम विभागाकडील मुल्यांकनाप्रमाणे निवाडयात खालील प्रमाणे समाविष्ट करणेत आले.

घरे व इतर बांधकामांचे किमतीचे प्रपत्रक (पावशी - पुरवणी निवाडा-२)

| अ. क्र. | स.नं./हि.नं./ गट नं. | जमिन मालकाचे नांव | घर पत्रकाप्रमाणे घर मालकाचे नांव | संपादन क्षेत्रात येणाऱ्या बांधकामांची संख्या | | | | मुल्यांकन रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | संयुक्त मोजणी पत्रका प्रमाणे | | मुल्यांकन अहवालाप्रमाणे | | |
| | | | | बांधकामाचा प्रकार | बांधकामाची संख्या | बांधकामाचा प्रकार | ग्रा.पं.घर नं. | |
| १ | ८९अ/२ अ पै | लक्ष्मीबाई गंगाराम कांदे वै.२८ | भास्कर तवटे | इमारत | १ | इमारत | ३९५ | २०११५०.०० |
| | | | | | | | एकूण - | २०११५०.०० |
| २ | ८९अ/१० अ पै | लक्ष्मीबाई गंगाराम कांदे वै.२८ | राजन तवटे | इमारत | १ | इमारत | -- | ३४१९५५.०० |
| | | | सुरेश मोतीराम तवटे | इमारत | १ | इमारत | -- | १०८६२१.०० |
| | | | | | | | एकूण - | ४५०५७६.०० |
| | | | | | | | एकूण रक्कम रुपये - | ६५१७२६.०० |

१७) विहिरींचे मुल्यांकन :-

प्रस्तुत प्रकरणी संयुक्त मोजणीनुसार संपादित क्षेत्रात विहिरी समाविष्ट नाहीत. त्यामुळे मुल्यांकन करणेचा प्रश्न उद्भवत नाही.

| अ. क्र. | स.नं./ हि.नं./ ग.नं. | जमिन व विहिरी मालकाचे नांव | संपादन क्षेत्रात येणाऱ्या बांधकामाची संख्या | | मुल्यांकन रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| | | | संयुक्त मोजणी प्रमाणे विहिरींची संख्या | मुल्यांकन अहवालाप्रमाणे विहिरींची संख्या | |
| निरंक | | | | | |

१८) विंधन विहिरींचे मुल्यांकन :-

प्रस्तुत प्रकरणी संयुक्त मोजणीनुसार संपादित क्षेत्रात विंधन विहिरी समाविष्ट नाहीत. त्यामुळे मुल्यांकन करणेचा प्रश्न उद्भवत नाही.

| अ. क्र. | स.नं./ हि.नं./ ग.नं. | जमिन व विहिरी मालकाचे नांव | संपादन क्षेत्रात येणाऱ्या बांधकामाची संख्या | | मुल्यांकन रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| | | | संयुक्त मोजणी प्रमाणे विहिरींची संख्या | मुल्यांकन अहवालाप्रमाणे विहिरींची संख्या | |
| निरंक | | | | | |

१९) धार्मिक मालमत्ता :-

संपादित जमिनीमध्ये मौजे पावशी, ता.कुडाळ येथील धार्मिक मालमत्ता/ जमिन संपादित होत नाही.

| अ.क्र. | मौजे | अवार्ड प्रपत्र ई अ.क. | मालमत्तेचा प्रकार | स.नं. | संपादीत क्षेत्र | स्टेटमेंट ई प्रमाणे रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| नि रं क | | | | | | |

२०) शासकीय जमीन :-

सदर प्रकरणातील मौजे पावशी, ता.कुडाळ येथील संपादित होणाऱ्या जमिनी सरकारी मालकी दर्शविलेली बाब सं.मो. अहवालाप्रमाणे संपादित होत नाही.

| अ.क्र. | स.नं. | तपशील | क्षेत्र | शेरा |
|---|---|---|---|---|
| नि रं क | | | | |

२१) पोटखराबा जमिनीचे मुल्यांकन :-

अंतिम निवाडयात प्रपत्र ई प्रमाणे संपादनाखालील जमिनीमध्ये येणाऱ्या पोटखराबा क्षेत्रासाठी मा.विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांजकडील पत्र क्र.जा.क्र.नर/निवाडा शाखा/पो.ख/धारणा कायम/२०१६/१४२, दि.१९/१०/२०१६ अन्वये कळविणेत आलेप्रमाणे पोटखराबा जमिनीचे बाजारमुल्य परिगणित करताना बाजारमुल्य दर तक्यातील मार्गदर्शक सुचनाप्रमाणे लागु करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे जमिनीच्या प्रकारानुसार पोटखराबासह सर्व क्षेत्र मुल्यांकनासाठी विचारात घेण्यात आलेले आहे. पोटखराबा जमिनी अभिलेख व स्थळ पहाणीनुसार निश्चित करणेत आलेल्या आहेत.

२२) कुळ :-

प्रस्तावीत जमिनीच्या मालकी बाबत कोणाचीही तक्रार नाही. तसेच गांव नमुना ७/१२ पाहता सदर संपादन जमिनीमध्ये कोणीही कुळ नसल्याचे दिसून येते. जमिनीची मालकी ७/१२ प्रमाणे मान्य करणेत आली आहे. त्यानुसार मोबदला रक्कम निवाडा पत्रकामध्ये हिशोबित करुन देय करणेत येईल.

२३) संपादित जमिनीचा ताबा :-

संपादित जमिनीचा ताबा संपादन संस्थेने घेतलेला नाही. त्या जमिनीचा ताबा अंतिम निवाडयानंतर संपादीत संस्थेस ताबा देण्याची कार्यवाही कलम ३H (१) प्रमाणे करणेत येईल.

२४) १००% दिलासा रक्कम :-

भूसंपादनातील योग्य नुकसान भरपाईचा अधिकारी व स्थानांतरण पुन:स्थापना आणि पुनर्वसन अधिनियम २०१३ मधील कलम ३०(१) नुसार देय संपादन मोबदला रकमेवर १००% दिलासा रक्कम हिशोबित करून देय करणेत आलेली आहे.

२५) संपादन क्षेत्रासाठी बाजार मुल्यांचा गुणक घटक (Multiplier Factors) :-

महाराष्ट्र शासन महसूल व वनविभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.एलक्युएन १२/२०१३/प्र.क्र.१९०(भाग-१५)/अ-२, दि.०६/१०/२०२१ व शासन निर्णय क्र.एलक्युएन १२/२०१३/प्र.क्र.१९०(भाग-१५)/अ-२, दि.१४/०१/२०२२ अन्वये (१.१) मध्ये नमूद केल्याप्रमाणे राष्ट्रीय / राज्यमहामार्ग सन्मुख जमिनीच्या भूसंपादन प्रकरणी तसेच विकास नियोजन क्षेत्रातील आणि प्रादेशिक नियोजन क्षेत्रातील ज्या जमिनीचा नोंदणी महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य यांनी प्रसिध्द केलेल्या दरांच्या वार्षिक विवरणपत्रांमध्ये बिगर कृषीदर विहित केला आहे. अशी जमीन संपादन प्रकरणी मोबदल्याच्या

रक्कमेची परिगणना करताना गुणक घटक १.०० राहिल असे महाराष्ट्र शासनाने अधिसूचीत करणेत आलेले आहे.

२६) अतिरिक्त घटक मोबदला :-

भूसंपादनातील योग्य नुकसान भरपाईचा अधिकार व स्थानांतरण, पुन:स्थापना आणि पुनर्वसन अधिनियम २०१३ मधील कलम ३० (३) नुसार प्रस्तुत भूसंपादन प्रकरणी कलम ३(A) अधिसूचना सडक परिवहन व राजमार्ग मंत्रालय, नवी दिल्ली, भारत सरकार, राजपत्र असाधारण भाग ॥ - खंड ३ — उपखंड (ii) अन्वये का.आ.१०८९ (अ), दि.१०/०३/२०२२ मध्ये प्रसिद्ध झालेली असून, अंतिम प्रसिद्धी १०/०५/२०२२ रोजी झालेली आहे. त्यामुळे उपरोक्त नवीन भूसंपादन अधिनियम २०१३ मधील कलम ३०(३) व भारत सरकार Minishtry of Road Transport and Highway यांजकडील पत्र क्र.No.NH-११०११/३०/२०१५-LA, दि.२८/१२/२०१७ नुसार प्रसिध्दीच्या दिनांकापासुन निवाडयाच्या तारखे पर्यंत म्हणजेच दि.१०/०५/२०२२ ते दि.२२/०५/२०२३ पर्यंत ३७७ दिवस जमिनीच्या मुळ किंमतींवर येणा-या बाजार मुल्यावर १२% अतिरिक्त घटकांची रक्कम हिशोबित करणेत आलेली आहे.

२७) मालकी हक्क :-

संपादीत होणाऱ्या जमिनीची मालकी निश्चित करण्यासाठी संबंधीत जमिनीच्या अधिकार अभिलेखातील (७/१२) नोंदी ग्राहय धरण्यात आल्या आहेत. मालकी हक्क व नुकसान भरपाई बाबत काही हरकती निर्माण झाल्यास त्यावर राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ कलम ३ H (४) प्रमाणे कार्यवाही करण्यात येईल. उक्त अधिनियमाचे कलम 3D व संयुक्त मोजणीचे वेळी मालकी हक्काबाबतचे दस्त ऐवज विचारात घेण्यात आले आहेत. तथापि, काही मालमत्ते संदर्भात मालकी हक्क शाबितीचा वाद उद्भवल्यास मालकी हक्काबाबत सक्षम न्यायालय जो आदेश देईल, त्या आदेशानुसार संबंधितांना नुकसान भरपाई वाटप करण्यात येईल. संपादित जमिन ही खुद्द मालकीची आहे ज्यांना नुकसान भरपाई वाटप केलेले आहे त्यांच्याकडून संपादित जमिनीचा ताबा घेण्यात येवून त्यांच्या मालकी हक्कामधुन ७/१२ उताऱ्यावरून संपादीत क्षेत्र कमी करून सदरचे संपादीत क्षेत्र केंद्र शासनाकडे (भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण) वर्ग करण्यात यावे. त्याबाबत स्वतंत्र आदेश काढण्यात येतील व तशी नोंद ७/१२ उताऱ्यावर हितसंबधीतांचे मालकी हक्कात घेण्यात यावी.

सदरील जमीनीवर बँकाचे कर्ज, तारण जप्ती इत्यादी आदेश नोंद केलेले आहेत व अशा संस्थांनी वसुली संदर्भात आपले दावे दाखल केलेले आहेत, अशा जमिनीची नुकसान भरपाई वसुली पात्र रक्कम प्रथम प्राधान्याने वसुल केली जाईल याची उपाययोजना करण्यात येईल.

ज्या जमिनींचे ७/१२ उताऱ्यावर बेकायदेशीर खरेदी-विक्री व्यवहार शर्तभंग इत्यादी नोंदी आहेत, अशा जमिनीची नुकसान भरपाई संबंधित तहसिलदार अथवा सक्षम प्राधिकारी यांचेकडील ना हरकत प्रमाणपत्र अथवा अशा नोंद कमी झाल्यानंतर नुकसान भरपाई देण्यात यावी. नवीन शर्तीच्या जमिनीची नुकसान भरपाई शासनाचे प्रचलित नियमाप्रमाणे नजराणा रक्कम वसुल करून उर्वरित रकमेचे

वाटप करावे व कपात केलेली रक्कम शासकीय कोषागारात जमा करावी. तसेच इनाम जमिनीबाबत मावेजा वाटप करता येणार नाही. नियमाप्रमाणे आवश्यकती कार्यवाही करावी.

संयुक्त मोजणीप्रमाणे संपादित क्षेत्र खाजगी व्यक्तीने धारण केले आहे. या बाबत उपअधिक्षक, भूमी अभिलेख व अधिकार अभिलेख यांच्याकडून खात्री करण्यात आली आहे. तथापी संपादन पैकी काही क्षेत्र यापूर्वी महामार्ग अथवा इतर शासकीय कारणासाठी संपादीत झालेली आहे, याबाबत कोणताही पुरावा उपलब्ध झाला तरी देखील आज रोजी अशा जमिनी संदर्भात मोबदला वाटप करण्यात येणार नाही. त्याचप्रमाणे अशा जमिनींचे बाबतीत मोबदला वाटप संबंधित जमीन धारकाने संपादनाबाबतची माहिती न देता स्विकारल्यास ते संबंधिताकडून वसुल करण्यास पात्र राहील.

**२८) आस्थापना सेवा शुल्क १.५% प्रमाणे आकारणी :-**

सदर प्रकरण राष्ट्रीय महामार्ग, भारत सरकार यांचे असलेमुळे संचिकेत १.५% आस्थापना रक्कमेची आकारणी निवाडयात करणेत आलेली आहे. (महाराष्ट्र शासन निर्णय क्र.संकीर्ण-१/२०१८, प्र.क्र.११/अ-२, दि.०४/०४/२०१८ मधील तरतुदीनुसार)

**२९) सोयी सुविधा खर्च १% प्रमाणे आकारणी :-**

सदर प्रकरण राष्ट्रीय महामार्ग, भारत सरकार यांचे असलेमुळे संचिकेत १% सुविधा खर्च शुल्क रक्कमेची आकारणी निवाडयात करणेत आलेली आहे. (महाराष्ट्र शासन निर्णय क्र.संकीर्ण-१/२०१८, प्र.क्र.११/अ-२, दि.०४/०४/२०१८ मधील तरतुदीनुसार)

३०) नुकसान भरपाई :-

या निवाडयाच्या निवाडा पत्रकामध्ये (प्रपत्र — ई मध्ये) नमुद केल्याप्रमाणे संपादित क्षेत्राची गट/स.नं. निहाय नुकसान भरपाई खालीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| अ | संपादित निवाडा जमिनीचे एकूण क्षेत्र (हे.आर.) | ०.१८.४० |
| ब | <u>जमिनीची मुळ किंमत कलम २६(१) प्रमाणे</u><br>जिरायत, बागायत, हंगामी बागायत, हायवेवरील, अकृषिक, संभाव्य अकृषिक इ. प्रमाणे रक्कम | २४,२८,८००.०० |
| क | <u>जमिनीची मुळ किंमत कलम २६(२) गुणक १.०० प्रमाणे</u><br>जिरायत, बागायत, हंगामी बागायत, हायवेवरील, अकृषिक, संभाव्य अकृषिक इ. प्रमाणे रक्कम | -- |
| | एकूण (ब + क) | २४,२८,८००.०० |
| १ | बांधकामाचे मुल्य:- घर/गोठा/दुकाने/मंदिर/पाण्याचे हौद/टाकी इत्यादी | ६,५१,७२६.०० |
| २ | विहीरींचे मुल्यांकन | -- |
| ३ | विंधन विहीरींचे मुल्यांकन | -- |
| ४ | वनझाडांचे मुल्यांकन | -- |
| ५ | फळझाडांचे मुल्यांकन | ६९,६००.४४ |
| | एकूण - (१ ते ५) | ७,२१,३२६.४४ |
| ६ | कलम २७ प्रमाणे एकूण रक्कम | ३१,५०,१२६.४४ |
| ७ | १००% सोलेशियम (दिलासा रक्कम) | ३१,५०,१२६.४४ |
| ८ | १२% रक्कम कलम ३०(३) प्रमाणे (कलम 3A पासून निवाडा दिनांकापर्यंत दि.१०/०५/२०२२ पासून दि.२२/०५/२०२३ पर्यंत म्हणजे ३७७ दिवस) | ३,०१,०३८.११ |
| | एकूण- (६ ते ८) | ६६,०१,२९०.९९ |
| | पुर्णांकात रक्कम रुपये | ६६,०१,२९१.०० |
| | महाराष्ट्र शासन निर्णय क्र.संकीर्ण-०१/२०१८, प्र.क्र.११/अ-२, दि.०४/०४/२०१८ मधील तरतूदी नुसार | |
| ९ | १.५% आस्थापना खर्च रक्कम राज्यशासनास जमा करणेसाठी | ९९,०१९.०० |
| १० | १% सोयी सुविधा खर्चाची रक्कम भूसंपादन अधिकारी यांच्या खात्यामध्ये जमा करण्यासाठी | ६६,०१३.०० |
| | एकूण रक्कम रुपये - | ६७,६६,३२३.०० |

सोबत निवाडा प्रपत्रक (अक्षरी रक्कम रूपये:- सदुसष्ट लाख सहासष्ट हजार तीनशे तेवीस मात्र)

३१) मोबदला वाटप प्रक्रिया :-

याप्रमाणे निर्धारित करणेत आलेली निवाडा रक्कम राष्ट्रीय महामार्ग कायदयाच्या कलम ३ H (१) मधील तरतूदीप्रमाणे केंद्र शासनाद्वारे सक्षम प्राधिकारी यांचेकडे जमा करावी. याप्रमाणे निवाडा रक्कम सक्षम प्राधिकारी यांचेकडे जमा केल्यावर उक्त अधिनियमाच्या कलम ३ H (२) अन्वये सक्षम प्राधिकारी केंद्र शासनाच्या वतीने या निवाडयाद्वारे संपादित करण्यात आलेल्या क्षेत्रातील पात्र हितसंबंधित व्यक्तिंना त्याच्या क्षेत्रा व हिश्यानुसार रक्कमेचे वाटप करतील व त्यांचेकडुन संपादित क्षेत्राचा ताबा घेतील. भूसंपादन मोबदला रक्कम वाटप करताना संपादित होणाऱ्या क्षेत्राच्या मालकीबद्दल अथवा मोबदला रक्कमेतील हिश्याबद्दल वाद निर्माण झाल्यास प्रमुख जिल्हा न्यायालय (The principal civil court of original jurisdiction within the limits of whose jurisdicition the land is situated) यांचेकडे उक्त अधिनियमाच्या कलम ३ H (४) नुसार त्यांचे निर्णयासाठी मोबदला रक्कम भरता येईल.

३२) जमिनीचा ताबा :-

राष्ट्रीय महामार्ग अधिनियमाच्या कलम ३ E (१) मधील तरतुदीनुसार सक्षम प्राधिकारी संपादित जमिनीच्या हितसंबंधितास हा निवाडा घोषित केल्यावर मोबदला रक्कम स्विकारणेसाठी व त्याचवेळी संपादित मिळकतीचा ताबा केंद्र शासनास हस्तांतरीत करणेकरिता लेखी नोटीसीद्वारे कळवतील. अशा नोटीसीची बजावणी झालेवर एकूण ६० दिवसाच्या कालावधीत जर हितसंबंधित व्यक्तिंनी ताबा हस्तांतर केला नाही तर उक्त अधिनियमाच्या कलम ३ E (२) प्रमाणे जिल्हाधिकारी यांना ताबा प्राप्त करणेकरीता सक्षम प्राधिकारी विनंती करतील व जिल्हाधिकाऱ्यांमार्फत सक्षम प्राधिकारी यांना अथवा त्यांचेद्वारे प्राधिकृत व्यक्तीस ताबा हस्तांतरीत केला जाईल.

३३) जमिनीचा वापर :-

संपादन करण्यात आलेली जमिन ही राष्ट्रीय महामार्गाच्या रूंदीकरण या सार्वजनिक प्रयोजनासाठी संपादित करण्यात आलेली आहे. या संपादनाखालील ज्या जमिनींना वनसंबधित कायद्याच्या तरतुदी लागू आहेत अथवा इतर कायद्यांच्या किंवा न्यायालयाच्या आदेशाद्वारे वापरातील बदलास निर्बंध लागू आहेत. या बाबतीत भूसंपादनानंतर अनुज्ञेय वापर सुरू करण्यापूर्वी वनविभाग अथवा त्या-त्या परिस्थितीतील निर्बंध असणाऱ्या विभागातील सक्षम स्तरावरून वापरातील निर्बंधाबाबत परवानगी घेवूनच संपादित करण्यात आलेल्या अशा मिळकती हया ज्या प्रयोजनासाठी संपादित केल्या आहेत त्या प्रयोजनसाठी वापर करण्यास पात्र ठरतील. अशा प्रकरणांमध्ये सक्षम स्तरावरून अनुज्ञेय वापरात बदल करून घेण्याची जबाबदारी संपुर्णतः संपादन संस्था म्हणजेच राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांची राहील म्हणजेच या भूसंपादन प्रक्रियेद्वारे संपादित जमिनींची केवळ मालकी (Title) संपादन संस्थेकडे कायदेशिरपणे हस्तांतरीत केली जात आहे. व त्याच्या वापरादरम्यान वनसंवर्धन कायद्याच्या तरतूदींचा भंग होणार नाही यांची जबाबदारी संपादन संस्थेची राहील.

३४) विश्लेषण :-

ज्याअर्थी वरील परिच्छेद क्रमांक ३० मध्ये **मौजे पावशी (पुरवणी निवाडा क्र.२), ता.कुडाळ** येथील संपादनाचे क्षेत्र व त्याअनुषंगाने कायदयातील तरतुदी विचारात घेता परिगणित करण्यात आलेली जमिन व तिच्याशी निगडीत जंगलीझाडे व फळझाडे यांच्या मोबदल्याचा एकत्रित सारांश दर्शविण्यात आलेला आहे. तसेच या निवाडयासोबत जोडलेल्या निवाडा पत्रकामध्ये संपादित होणाऱ्या सर्व्हे नंबर / गट नंबर निहाय विस्तृतपणे अनुज्ञेय मोबदल्याचा तपशिल विषद करण्यात आलेला आहे.

त्याअर्थी राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ च्या कलम ३ G (१) प्रमाणे सक्षम प्राधिकारी म्हणून केंद्र शासनाने संदर्भिय क्रमांक १ नुसार दिलेल्या अधिकारांचा वापर करून उक्त कायद्याच्या कलम ३ D नुसार **मौजे पावशी (पुरवणी निवाडा क्र.२), ता.कुडाळ** येथील संपादित करण्यात आलेल्या मिळकतींचा निवाडा या आदेशाद्वारे घोषित झाला आहे असे जाहिर करण्यात येत आहे. ज्याअर्थी हा निवाडा घोषित करण्यात आला आहे त्याअनुषंगाने उक्त अधिनियमाच्या कलम ३ (E) व ३ (H) प्रमाणे सर्व हितसंबंधीतांस नोटीसा देण्यात याव्यात. ज्याअर्थी राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ च्या कलम ३G प्रमाणे हा निवाडा जाहिर झाला असुन अंतिमत: संपादित जमिनीवरील सर्व हितसंबधी यांचे/ खातेदारांचे सर्व हक्क संपुष्टात येवून ही मिळकत त्या मिळकतीवर असलेल्या सर्व झाडे, इतर मालमत्तांसह तसेच संपुर्ण बोजा विरहित व भारमुक्त (Free From All Encumbrances) होऊन केंद्र शासनाच्या सडक व परिवहन मंत्रालय, नवी दिल्ली यांचे नांवे निहित करणेत येत आहे. तसेच ज्या अर्थी या निवाडयाद्वारे संपादित जमिन ही सर्व भार मुक्त होऊन केंन्द्र शासनाचे वरील मंत्रालयाचे नांवे विहित करणेत आली आहे. त्याअर्थी सदर जमिनींच्या आज रोजी पर्यंत अनुज्ञेय असलेल्या सर्व प्रकारचा जमिन महसूल कमी करणेची कार्यवाही करणेचा म्हणजेच सारा माफीचा आदेश देखील याद्वारे देण्यात येत आहे.

## आदेश

याद्वारे जाहिर करण्यात येत आहे की,

१) **मौजे- पावशी (पुरवणी निवाडा क्र.२), ता. कुडाळ** जिल्हा सिंधुदुर्ग येथील राष्ट्रीय महामार्ग अधिनियम, १९५६ चे कलम ३D अंतर्गत अधिसूचित **एकूण ०.१८.४० हे.आर.** एवढे क्षेत्र उक्त अधिनियमाच्या कलम ३G नुसार निर्धारित करण्यात आलेल्या **एकूण रक्कम रु.६७,६६,३२३.०० (सदुसष्ट लाख सहासष्ट हजार तीनशे तेवीस मात्र)**एवढया मोबदल्याच्या विनिमयात अंतिमत संपादित करणेत आले आहे.

२) सर्व खातेदारांस/ हितसंबधीयास उक्त अधिनियमाच्या कलम ३E व ३H नुसार लेखी नोटीसा देवून याबाबत कळविणेत यावे.

३) एकूण निवाडयात नमुद आस्थापना खर्च १.५% **एकूण रक्कम रू.९९,०१९.०० (नव्याण्णव हजार एकोणीस मात्र )** शुल्क सक्षम प्राधिकारी यांनी शासनास जमा करावे.

४) निवाडयाच्या रक्कमेच्या एकूण १% सोई सुविधा शुल्क **एकूण रक्कम रू.६६,०१३.०० ( सहासष्ट हजार तेरा मात्र )** सक्षम प्राधिकारी तथा भूसंपादन अधिकारी यांच्या खात्यात जमा करावी.

५) या निवाडयाद्वारे घोषित क्षेत्राच्या अधिकार अभिलेखात भोगवटादार सदरी संपादन संस्था म्हणजेच सडक व परिवहन मंत्रालय, भारत सरकार नवी दिल्ली यांचे नांवे संपादित क्षेत्रापुरते दाखल करण्यात यावे.

६) उक्त अधिनियमाच्या कलम ३ E व ३ H नुसार पुढील नोटीसा प्रक्रिया पुर्ण केल्यावर म्हणजेच भूसंपादन मोबदला देवू केल्यावर (offer) वितरण (Disburesement) आणि कायद्यात व त्या अनुषंगाने या निवाडयात निर्दिष्ट ताबा प्रकिया पुर्ण केलेवर, सक्षम प्राधिकारी यांचे कार्यालयामार्फत **मौजे पावशी (पुरवणी निवाडा क्र.२)**, ता. कुडाळ येथील उक्त अधिनियमाचे कलम ३A व ३D नुसार प्रसिद्ध करणेत आलेल्या अधिसूचना या घोषित निवाडयाची प्रत आणि विधीवत घेण्यात आलेल्या ताबे पावत्यांच्या सह कमी जास्त पत्रक करणेकामी उपअधिक्षक भूमि अभिलेख यांनी कमी जास्त पत्रक पारीत करून पुढील कार्यवाहीसाठी क्षेत्रीय महसूल विभागाकडे सादर करावे. कमी जास्त पत्रकाचा अधिकार अभिलेखात अमंल दिल्यावर गांव नमुना नं.७/१२ संपादन संस्थेस शुल्क उपलब्ध करून देण्याची जबाबदारी क्षेत्रीय महसूल यंत्रणेची राहील.

निवाडा पत्रकामध्ये नमूद केल्याप्रमाणे प्रत्येक जमिनीची नुकसान भरपाई संबंधीतास मालकी हक्क व इतर आवश्यक बाबी तपासून अदा करावी. नुकसान भरपाई वाटप व जमिनीचा ताबा घेण्यासाठी सर्व संबंधीतांना वैयक्तिक नोटीसा कलम ३(E) व ३(H) अन्वये देण्यात याव्यात व जमिनीचा कायदेशीर ताबा राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ मधील तरतूदीनुसार सक्षम प्रधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), कुडाळ यांजकडे अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या व्यक्तीकडे देण्यात यावा असा आदेश करण्यात येत आहे. अंतिम निवाडा राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ कलम ३ G (१) अन्वये सक्षम प्राधिकारी म्हणून प्राप्त झालेल्या अधिकारानुसार दिनांक २२/०५/२०२३ रोजी देण्यात येत आहे.

ठिकाण :- कुडाळ
दिनांक :- २२/०५/२०२३

( ऐश्वर्या काळुशे )
**सक्षम प्राधिकारी तथा**
**उपविभागीय अधिकारी (महसूल), कुडाळ**